**असेही प्रबोधन** • 'बर्ड फ्लू'ला घाबरू नका, कोरोनाविषयक सल्लागार डॉ. म्हैसेकर आणि जिल्हाधिकारी भोसले यांचा कृतीतून संदेश

# जिल्हाधिकारी म्हणाले, बिनधास्त खा अंडी व चिकन... !

**प्रतिनिधी** | नगर

काही राज्यांत, तसेच महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव झाला आहे. मात्र, अंडी आणि चिकन खाण्यासाठी पूर्णपणे सुरक्षित असल्याचे राज्य शासनाचे कोरोनाविषयक सल्लागार डॉ. दीपक म्हैसेकर आणि जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले यांनी सोमवारी स्पष्ट केले. जिल्ह्यातील पोल्ट्री असोसिएशनने आयोजित केलेल्या कार्यक्रमात या दोघांनीही चिकनचा मनसोक्त आस्वाद घेत ते पूर्ण सुरक्षित असल्याचा कृतिशील संदेश नागरिकांना दिला.

'बर्ड फ्लू'मुळे पोल्ट्री व्यवसाय संकटात आहे. 'बर्ड फ्लू'च्या प्रादुर्भावामुळे नागरिक चिकन खाण्यास कचरत आहेत. शेतीला पूरक व्यवसाय असलेला पोल्ट्री व्यवसाय अडचणीत आल्याने शेतकऱ्यांसमोर दुहेरी संकट उभे आहे. याबाबतच्या अफवा आणि गैरसमज दूर करण्यासाठी पोल्ट्री असोसिएशनने पुढाकार घेतला. डॉ. म्हैसेकर आणि जिल्हाधिकारी डॉ. भोसले यांनी त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला. निवासी उपजिल्हाधिकारी संदीप निचित, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. सुनील तुंबारे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त बी. एन. शेळके, पोल्ट्री असोसिएशनचे डॉ. देविदास शेळके, डॉ. उमाकांत शिंदे, शिवाजी शिंदे, विनय माचवे, रोहिदास गायकवाड, संतोष कानडे, दीपक गोल्क, दत्तात्रय सोनटक्के, कानिफ कोल्हे, डॉ. कुकडे, अनिल झारेकर, विठ्ठल जाधव, गोरख शेळके यावेळी उपस्थित होते.

केवळ गैरसमज आणि अफवांमुळे पोल्ट्री व्यवसाय अडचणीत येऊ नये. शेतीपूरक व्यवसायात पशुधनानंतर कुक्कुटपालनात जिल्हा आघाडीवर आहे. त्याची घडी बिघडू नये. त्यासाठी पोल्ट्री संघटनेने घेतलेला पुढाकार व त्याला जिल्हाधिकाऱ्यांनी मनापासून दिलेला प्रतिसाद चर्चेचा विषय ठरला आहे.



चिकनचा आस्वाद घेताना जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले व अन्य अधिकारी.

## आधी केले, मग सांगितले...

समाजात एखादा संदेश देताना शक्यतो प्रशासकीय अधिकारी नोटीस किंवा लेखी आदेश काढतात. त्यामुळे ती बाब नागरिकांना मान्य करावी लागते, पण 'बर्ड फ्लू'संदर्भात असलेले गैरसमज दूर व्हावेत, म्हणून जिल्हाधिकारी डॉ. भोसले यांनी आधी स्वतः 'खाऊन दाखवले' अन् नंतर ते आरोग्याला चांगले असल्याचे सांगितले.

लोकमत

पाचवी ते आठवी : २७ जानेवारीपासून शाळा होणार सुरू

# जिल्ह्यातील ६६१४ शिक्षकांची होणार कोरोना चाचणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहमदनगर :** नववी ते बारावीपर्यंतच्या शाळा सुरू झाल्यानंतर आता २७ जानेवारीपासून पाचवी ते आठवीपर्यंतच्या शाळा सुरू करण्यास शासनाने हिरवा कंदील दाखवला आहे. त्यादृष्टीने नगर जिल्ह्यात पाचवी ते आठवीपर्यंत ६ हजार ६१४ शिक्षक असून, त्या सर्वांची कोरोना चाचणी होणार आहे.

राज्यात २३ नोव्हेंबरपासून नववी ते बारावीपर्यंत शाळा सुरू करण्याचा निर्णय झाला. टप्प्याटप्प्याने या शाळांची उपस्थिती वाढत आहे. राज्यात कोरोनाची साथ आटोक्यात आल्याने आता पाचवी ते आठवीपर्यंतचे वर्ग सुरू करण्याबाबत शासनाने सोमवारी (दि. १८) आदेश काढला आहे. त्या अनुषंगाने नगर जिल्ह्यातही तयारी सुरू झाली असून, शिक्षणाधिकाऱ्यांनी शिक्षकांना तशा सूचना दिल्या आहेत. नगर जिल्ह्यात पाचवी ते आठवीपर्यंत २००३ शाळा असून, त्यात ३ लाख ७ हजार ७७७ विद्यार्थी तर ६,६१४ शिक्षक आहेत.

## विद्यार्थी संख्या




३,०७,७७७

विद्यार्थ्यांची संख्या

६६१४

शिक्षकांची संख्या

## कोरोना चाचणी करण्याची तयारी

२७ जानेवारीला शाळा सुरू होणार असल्याने जिल्ह्यातील पाचवी ते आठवी अशा एकूण ६ हजार ६१४ शिक्षकांची कोरोना चाचणी (आरटीपीसीआर) होणार आहे. शिक्षणाधिकाऱ्यांनी तशा सूचना शिक्षकांना दिल्या आहेत. कोरोना चाचणी अहवाल निगेटिव्ह आल्यानंतरच शिक्षकांना शाळेत हजर राहता येणार आहे.



पाचवी ते आठवीच्या शाळा सुरू करण्याबाबतचा शासन आदेश सोमवारी दुपारी प्राप्त झाला. त्यादृष्टीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी चर्चा करून पुढील नियोजन केले आहे. प्रथम शिक्षकांची कोरोना चाचणी होणार आहे. शाळा निर्जंतुकीकरणाच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

- शिवाजी शिंदे, शिक्षणाधिकारी, प्राथमिक विभाग

लोकमत

# चिकन खाण्यासाठी पूर्ण सुरक्षित

## जिल्हाधिकाऱ्यांचा संदेश : बर्ड फ्ल्यूच्या पार्श्वभूमीवर पार्टी

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहमदनगर :** बर्ड फ्ल्यूच्या पार्श्वभूमीवर चिकन खाण्याबाबत साशंकता निर्माण झाल्याने जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले यांनी पुढाकार घेत 'नगर निवास' या शासकीय निवासस्थानाच्या आवारात चिकन पार्टी करून अंडी आणि चिकन खाण्यासाठी पूर्ण सुरक्षीत असल्याचा संदेश दिला.

राज्यात काही ठिकाणी बर्ड फ्ल्यू आढळून आल्यानंतर पोल्ट्री व्यवसाय संकटात आल्याचे चित्र होते. बर्ड फ्ल्यू च्या प्रादुर्भावामुळे नागरिक चिकन खाण्याविषयी कचरत होते. त्यांच्या मनात असणाऱ्या भीतीमुळे या व्यवसायावरही परिणाम होऊन शेतीला पूरक व्यवसाय असणाऱ्या पोल्ट्री व्यवसाय अडचणीत आला आहे. मात्र, अशा अफवा आणि गैरसमज दूर करण्यासाठी पोल्ट्री असोसिएशनने घेतलेल्या पुढाकाराला जिल्हाधिकारी डॉ. भोसले यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. निवासी उपजिल्हाधिकारी संदीप निचित, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. सुनील तुंबारे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त बी.एन शेळके, पोल्ट्री असोसिएशनचे डॉ. देविदास शेळके, डॉ. उमाकांत शिंदे, शिवाजी शिंदे, विनय माचवे, रोहिदास गायकवाड, संतोष कानडे, दीपक गोलक, दत्तात्रय सोनटक्के आदी यावेळी उपस्थित होते.

देशाच्या काही राज्यात तसेच महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात बर्ड फ्ल्यूचा प्रादुर्भाव दिसून आला आहे. अंडी आणि चिकन खाण्यासाठी पूर्णपणे सुरक्षित असल्याचे राज्य शासनाचे कोरोनाविषयक सल्लागार डॉ.दीपक म्हैसेकर आणि जिल्हाधिकारी डॉ. राजेन्द्र भोसले यांनी स्पष्ट केले आहे. जिल्ह्यातील पोल्ट्री असोसिएशनने आयोजित केलेल्या कार्यक्रमात या दोघांनीही चिकनचा आस्वाद घेत ते पूर्णता सुरक्षित असल्याचा कृतिशील संदेश जिल्हावासियांना दिला.

### अहवाल प्रतीक्षेत

जिल्ह्यात २६० पक्षी मृत झाले. त्यातील प्रत्येक गावातील मिळून एकूण २३ पक्ष्यांचे नमुने पुणे येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते. त्याचा अहवाल अद्याप प्रतीक्षेत आहे. दरम्यान, पोल्ट्री व्यावसायिकांना त्यांचे शेड स्वच्छता करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. या पाश्वर्वभूमिवर जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले यांनी अंडी आणि चिकन खाण्यासाठी पूर्ण सुरक्षीत असल्याचा संदेश दिला.

# करोना लसीकरण पूर्णपणे सुरक्षितच

## डॉ. दीपक म्हैसेकर; करोनाविषयक उपाययोजनांचा आढावा

**नगर, दि. १८ (प्रतिनिधी)** - जिल्ह्यात करोनाची साखळी तोडण्यासाठी अधिकाधिक आरटीपीसीआर चाचण्या घेणे तसेच बाधित व्यक्तींच्या निकट संपर्कातील व्यक्तींच्या लवकर चाचण्या होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने जिल्हा प्रशासन आणि आरोग्य यंत्रणेने कार्यवाही करण्याच्या सूचना राज्य

### आरटीपीसीआर चाचण्यांचे प्रमाण वाढविण्याच्या सूचना

शासनाचे कोविड सल्लागार डॉ. दीपक म्हैसेकर यांनी केल्या.

दरम्यान, करोना लसीकरण पूर्णपणे सुरक्षितच आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरुन जाण्याचे किंवा मनात ▶ पान २ वर...

## करोनावर देशाचा कोटीमोलाचा विजय

**नवी दिल्ली, दि. १८** - देशात करोनामुक्तांच्या संख्या आणि बाधितांच्या संख्येतील फरक एक कोटीहून अधिक झाला आहे, अशी माहिती केंद्रीय

# बिनधास्त खा...चिकन अन् अंडी

## डॉ. म्हैसेकर, जिल्हाधिकाऱ्यांनी दिला प्रत्यक्ष कृतीतूनच संदेश

### बर्ड फ्लूला घाबरण्याचे कारण नसल्याचा निर्वाळा

नगर, दि. १८ (प्रतिनिधी) - देशाच्या काही राज्यांत तसेच महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव दिसून आला असला, तरी अंडी आणि चिकन खाण्यासाठी पूर्णपणे सुरक्षित असल्याचे राज्य शासनाचे करोनाविषयक सल्लागार डॉ. दीपक म्हैसेकर आणि जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले यांनी स्पष्ट केले आहे.



जिल्ह्यातील पोल्ट्री असोसिएशनने आयोजित ▶ पान २ वर...

प्रभात Tue, 19 January 2021
https://epaper.eprabhat.net/c/57828986

# बिनधास्त खा...चिकन अन् अंडी

## डॉ. म्हैसेकर, जिल्हाधिकाऱ्यांनी दिला प्रत्यक्ष कृतीतूनच संदेश

### बर्ड फ्लूला घाबरण्याचे कारण नसल्याचा निर्वाळा

**नगर, दि. १८ (प्रतिनिधी)** - देशाच्या काही राज्यांत तसेच महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव दिसून आला असला, तरी अंडी आणि चिकन खाण्यासाठी पूर्णपणे सुरक्षित असल्याचे राज्य शासनाचे करोनाविषयक सल्लागार डॉ. दीपक म्हैसेकर आणि जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले यांनी स्पष्ट केले आहे.



जिल्ह्यातील पोल्ट्री असोसिएशनने आयोजित ▶ पान २ वर...

प्रभात Tue, 19 January 2021
https://epaper.eprabhat.net/c/57828986

# बिनधास्त खा...चिकन अन् अंडी

केलेल्या कार्यक्रमात या दोघांनीही चिकनचा आस्वाद घेत ते पूर्णता सुरक्षित असल्याचा कृतिशील संदेश जिल्हावासियांना दिला. राज्यात काही ठिकाणी बर्ड फ्लू आढळून आल्यानंतर पोल्ट्री व्यवसाय संकटात आल्याचे चित्र होते. बर्ड फ्लूच्या प्रादुर्भावामुळे नागरिकांना चिकन खाण्याविषयी कचरत होते. त्यांच्या मनात असणाऱ्या भीतीमुळे या व्यवसायावरही परिणाम होऊन शेतीला पूरक व्यवसाय असणाऱ्या पोल्ट्री व्यवसाय अडचणीत आला होता. मात्र, अशा अफवा आणि गैरसमज दूर करण्यासाठी पोल्ट्री असोसिएशनने घेतलेल्या पुढाकाराला डॉ. म्हैसेकर आणि जिल्हाधिकारी डॉ. भोसले यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

प्रभात Tue, 19 January 2021
https://epaper.eprabhat.net/

# करोना लसीकरण पूर्णपणे सुरक्षितच

शंका बाळगण्याचे कारण नाही. कोणतीही लस अथवा इंजेक्शन घेतल्यानंतर किरकोळ प्रमाणात ताप, अंग दुखणे, मळमळ होणे आदी लक्षणे जाणवतात. त्यामुळे घाबरण्याचे कारण नाही. लसीकरणावेळी जिल्ह्यात चार आरोग्य कर्मचाऱ्यांना जाणवलेली लक्षणे याच प्रकारची होती. त्यामुळे कोणताही गैरसमज या लसीकरणाविषयी नको, असे त्यांनी स्पष्ट केले. जिल्हाधिकारी कार्यालय सभागृहात आज डॉ. म्हैसेकर यांनी करोनाविषयक उपचारांचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र क्षीरसागर, निवासी उपजिल्हाधिकारी संदीप निचित, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संदीप सांगळे, जिल्हा शल्यचिकित्सक सुनील पोखरणा, महापालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी अनिल बोरगे, इंडियन मेडिकल असोसिएशनचे जिल्हा अध्यक्ष डॉ. अनिल आठरे, डॉ. एस. दीपक आदी यावेळी उपस्थित होते.

प्रभात Tue, 19 January 2021 https://epaper.eprabhat.net/

पुढारी



नगर : कार्यक्रमात चिकनचा आस्वाद घेताना डॉ. दीपक म्हैसेकर व जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले आदी.(छाया : समीर मन्यार)

# अंडी-चिकन खाण्यास सुरक्षित : डॉ.म्हैसेकर

## जिल्हाधिकाऱ्यांसह घेतला आस्वाद

**नगर : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील काही जिल्ह्यात बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव झाला असला तरी, अंडी आणि चिकन खाण्यासाठी पूर्णपणे सुरक्षित आहे, असा दावा राज्य शासनाचे कोरोनाविषयक सल्लागार डॉ. दीपक म्हैसेकर यांनी केला आहे.

जिल्ह्यातील पोल्ट्री असोसिएशनने आयोजित केलेल्या कार्यक्रमात डॉ. म्हैसेकर आणि जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले यांनी चिकनचा आस्वाद घेत, ते पूर्णता सुरक्षित असल्याचा कृतिशील संदेश जिल्हावासियांना दिला.

डॉ. म्हैसेकर म्हणाले की, राज्यात काही ठिकाणी बर्ड फ्लू आढळून आल्यानंतर पोल्ट्री व्यवसाय संकटात आल्याचे चित्र आहे. बर्ड फ्लूच्या प्रादुर्भावामुळे नागरिक चिकन खाण्यास घाबरत आहेत. त्यांच्या मनात असणाऱ्या भीतीमुळे पोल्ट्री व्यवसायावरही परिणाम होऊन, शेतीला पूरक असणारा हा व्यवसाय अडचणीत आला आहे.

पोल्ट्री असोसिएशनने घेतलेल्या पुढाकारामुळे हा गैरसमज दूर होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संदीप निचित, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. सुनील तुंबारे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. बी. एन. शेळके, पोल्ट्री असोसिएशनचे डॉ. देविदास शेळके, डॉ. उमाकांत शिंदे, शिवाजी शिंदे, विनय माचवे, रोहिदास गायकवाड, संतोष कानडे, दीपक गोलक, दत्तात्रय सोनटक्के, कानिफ कोल्हे, डॉ. कुकडे, अनिल झारेकर, विठ्ठल जाधव, गोरख शेळके आदींसह असोसिएशनचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.



Ahmednagar Edition
Jan 19, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# जिल्ह्यात आठवडाभरात २७४ पक्ष्यांचा मृत्यू

**नगर : पुढारी वृत्तसेवा**

नगर तालुक्यात निंबळक येथे सोमवारी १२ कोंबड्या, तर भोयरे पठार येथे एक कावळा मरण पावला आहे. बर्ड फ्लू सदृश परिस्थितीत गेल्या आठ दिवसांत जिल्ह्यात एकूण २७४ पक्षी मरण पावले आहेत. यामध्ये २६६ कोंबड्यांचा समावेश आहे. मात्र, बर्ड फ्लू विषाणूने भानगावमध्ये एक कावळ्याचा मृत्यू झाल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

राज्यात बर्ड फ्लू बाधित पक्षी आढळून येत आहेत. अशा परिस्थितीत जिल्ह्यात फक्त श्रीगोंदे तालुक्यातील भानगाव येथे १ कावळा बर्ड फ्लू बाधित आढळलेला आहे. गेल्या आठ दिवसांत जिल्ह्यात तब्बल २७४ पक्षी मरण पावले आहेत. यामध्ये पाथर्डी तालुक्यातील मिडसांगवी येथील ६३ कोंबड्या, श्रीगोंदे तालुक्यात १ कावळा व १ कबूतर, जामखेड तालुक्यातील मोहा येथे एक कावळा, अकोले तालुक्यातील धामणगाव पाट येथे १ बुलबुल व राहाता तालुक्यातील पुणतांबे येथे १ कावळा यांचा समावेश आहे.

श्रीगोंदे तालुक्यातील भानगाव येथे मृतावस्थेत आढळलेला कावळा तपासणीअंती बर्ड फ्लू बाधित आढळून आलेला आहे. आतापर्यंत मिडसांगवी येथील कोंबड्यांचा अहवाल बर्ड फ्लू निगेटिव्ह आलेला आहे. अद्याप मृतावस्थेतील २३ पक्ष्यांचे अहवाल येणे बाकी आहेत. मरण पावलेल्या पक्ष्यांच्या संख्येत कोंबड्याची संख्या सर्वाधिक २६६ असून देखील, आतापर्यंत एकाही कोंबडीत 'बर्ड फ्लूचा'चा विषाणू आढळून आलेला नाही.

गेल्या आठ दिवसांत नगर तालुक्यात सर्वाधिक २०३ कोंबड्या मरण पावलेल्या आहेत. यामध्ये आठवड येथील १२५, निंबळक येथील ७५ व चिंचोडी पाटील येथील ३ कोंबड्यांचा समावेश आहे. नगर महापालिका कार्यक्षेत्रातील विद्या कॉलनीत १६ जानेवारी रोजी एक भारद्वाज पक्षी मृतावस्थेत सापडलेला आहे. बाराबाभळीत एक साळुंकी, भोयरे पठार येथे काल १ कावळा मृतावस्थेत आढळून आला आहे.

My Ahmednagar Edition
Jan 19, 2021 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# जिल्ह्यात आठवडाभरात २७४ पक्ष्यांचा मृत्यू

**नगर : पुढारी वृत्तसेवा**

नगर तालुक्यात निंबळक येथे सोमवारी १२ कोंबड्या, तर भोयरे पठार येथे एक कावळा मरण पावला आहे. बर्ड फ्लू सदृश परिस्थितीत गेल्या आठ दिवसांत जिल्ह्यात एकूण २७४ पक्षी मरण पावले आहेत. यामध्ये २६६ कोंबड्यांचा समावेश आहे. मात्र, बर्ड फ्लू विषाणूने भानगावमध्ये एक कावळ्याचा मृत्यू झाल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

राज्यात बर्ड फ्लू बाधित पक्षी आढळून येत आहेत. अशा परिस्थितीत जिल्ह्यात फक्त श्रीगोंदे तालुक्यातील भानगाव येथे १ कावळा बर्ड फ्लू बाधित आढळलेला आहे. गेल्या आठ दिवसांत जिल्ह्यात तब्बल २७४ पक्षी मरण पावले आहेत. यामध्ये पाथर्डी तालुक्यातील मिडसांगवी येथील ६३ कोंबड्या, श्रीगोंदे तालुक्यात १ कावळा व १ कबूतर, जामखेड तालुक्यातील मोहा येथे एक कावळा, अकोले तालुक्यातील धामणगाव पाट येथे १ बुलबुल व राहाता तालुक्यातील पुणतांबे येथे १ कावळा यांचा समावेश आहे.

श्रीगोंदे तालुक्यातील भानगाव येथे मृतावस्थेत आढळलेला कावळा तपासणीअंती बर्ड फ्लू बाधित आढळून आलेला आहे. आतापर्यंत मिडसांगवी येथील कोंबड्यांचा अहवाल बर्ड फ्लू निगेटिव्ह आलेला आहे. अद्याप मृतावस्थेतील २३ पक्ष्यांचे अहवाल येणे बाकी आहेत. मरण पावलेल्या पक्ष्यांच्या संख्येत कोंबड्याची संख्या सर्वाधिक २६६ असून देखील, आतापर्यंत एकाही कोंबडीत 'बर्ड फ्लूचा'चा विषाणू आढळून आलेला नाही.

गेल्या आठ दिवसांत नगर तालुक्यात सर्वाधिक २०३ कोंबड्या मरण पावलेल्या आहेत. यामध्ये आठवड येथील १२५, निंबळक येथील ७५ व चिंचोडी पाटील येथील ३ कोंबड्यांचा समावेश आहे. नगर महापालिका कार्यक्षेत्रातील विद्या कॉलनीत १६ जानेवारी रोजी एक भारद्वाज पक्षी मृतावस्थेत सापडलेला आहे. बाराबाभळीत एक साळुंकी, भोयरे पठार येथे काल १ कावळा मृतावस्थेत आढळून आला आहे.

My Ahmednagar Edition
Jan 19, 2021 Page No. 1
newspaper.pudhari.co.in